# प्रेसनोट

दि. २१/०६/२०२४

**भूमि अभिलेख कार्यालय., हवेली, येरवडा येथे भु-करमापक व खाजगी इसमाविरूध्द लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | येरवडा पोलीस स्टेशन, पुणे शहर, गु.रजि.नं. ३९०/२०२४ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अ,१२ |
| तक्रारदार | पुरूष, वय - ३१ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) दौलत मधुकर गायकवाड, वय ३५ वर्षे, पद भू करमापक, भूमी अभिलेख कार्यालय, हवेली, येरवडा, पुणे,<br>२) योगेश्वर राजेंद्र मारणे, वय २५ वर्षे, (खाजगी इसम), रा. मेंदळ गॅरेज, एरंडवणे, पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ४,००,०००/- रुपये |
| तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | ५०,०००/- रुपये |

**पडताळणी व सापळा कारवाई दिनांक** :- २०/०६/२०२४.

**गुन्हा दाखल दिनांक** :- २१/०६/२०२४.

**थोडक्यात माहिती** :- यातील तक्रारदार यांची देहुगाव येथे जमीन आहे, ती जमीन मोजणीसाठी व क्षेत्राची हद्द ठरवून देण्यासाठी यातील आरोपी क्र. १ यांनी रू. ४,००,०००/- ची लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची ला.प्र.वि.विभागाकडून पंचांसमक्ष पडताळणी केली असता, खाजगी इसम आरोपी क्र. २ योगेश्वर राजेंद्र मारणे याने आरोपी क्र. १ दौलत मधुकर गायकवाड ह्यांचे सांगण्यावरून आ.लो.से.क्र. १ करीता तक्रारदार यांचे वरील काम करून देण्यासाठी रू. ५०,०००/- लाचेची मागणी करून रू. ५०,०००/- लाचेची रक्कम तक्रारदार यांचेकडून पंचांसमक्ष स्विकारली असताना मिळून आल्याने त्या दोघांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांचेविरूध्द येरवडा पोलीस स्टेशन येथे वरील प्रमाणे गुन्हा नोंद केलेला आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक श्री. श्रीराम शिंदे हे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१. **ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१३२८०२**
२. **व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००**
३. **ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in**
४. **वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in**

(नितिन जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.